# भारतातील आणि भारताबाहेरील
# १२ कोटी मराठी भाषिकांचे वैश्विक कुटुंब...!

## विश्व मराठी परिषद

**।। अवघे विश्वची माझे घर ।।**

द्वारा विश्व मराठी फाउंडेशन

नोंदणी क्रमांक - CIN : U93020PN2019NPL181823

**संकल्पना**

महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटी आहे. महाराष्ट्राबाहेर संपूर्ण भारतात विविध राज्यांमध्ये २.५ कोटी मराठी बांधव राहतात. जगातील १९२ देशांपैकी साधारणपणे ९० हून अधिक देशांमध्ये ९० लाखाहून अधिक मराठी बांधव वास्तव्य करून आहेत. या एकूण १५ कोटीतील १२ कोटीहून अधिक बांधवांची मातृभाषा मराठी आहे. या १२ कोटी मराठी बांधवांनी एकमेकांना सहकार्य करून सक्षम, संपन्न आणि समृद्ध असा वैश्विक मराठी समाज निर्माण केला पाहिजे. भाषा, साहित्य आणि संस्कृतीद्वारे माय मराठी तिच्या पुत्रांबरोबर एका आत्मिय बंधनाने जोडली गेली आहे. प्रत्येक मराठी बांधवाच्या अंतर्मनामध्ये मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती याबद्दल अनिवार प्रेम आणि उत्कट जिव्हाळा दडलेला आहे.

व्हॉट्सॲप, फेसबुक, ईमेल, इंस्टाग्राम, ट्विटर, युट्युब, लिंक्ड-इन आणि अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून १२ कोटी मराठी बांधवांना एकत्र जोडायचे, त्यांच्या जिव्हाळ्याचे, त्यांच्या जीवनामध्ये निखळ आनंद निर्माण करणारे आणि त्यांना उपयुक्त ठरणारे अनेक उपक्रम राबवायचे अशी विश्व मराठी परिषदेची मुख्य संकल्पना आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार होणारे मुक्त व्यासपीठ, प्रत्येकाचा सहभाग आणि आपल्या निर्मितीचा सर्वदूर प्रसार हे विश्व मराठी परिषदेचे वैशिष्ट्य असेल. या संकल्पनेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व सदस्य कनेक्टेड असतील आणि करोडो मराठी बांधवांचे व्यासपीठ प्रत्येकाला उपलब्ध असेल. आपली कला आणि निर्मिती या माध्यमातून करोडो मराठी बांधवांपर्यंत पोहोचवता येईल. यातून आपल्या क्षमता विकसित होतील, नानाविध संधी निर्माण होतील, आपले जीवन विलक्षण चैतन्यदायी होईल आणि या सर्वातून सक्षम, संपन्न, समृद्ध, वैश्विक मराठी भाषिक सामाज निर्माण होईल.

**प्रयोजन**

स्वतंत्र भारतामध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. मात्र महाराष्ट्राचा ज्ञात इतिहास इसवी सनाच्या पूर्वी दुसऱ्या शतकापासूनचा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम ही महाराष्ट्राची आद्य दैवते आहेत. भारतीय व्यक्ती, हिंदू व्यक्ती राजा बनू शकते हे छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या असिम कर्तृत्वाने सिद्ध करून दाखवले. इ.स.च्या १८व्या शतकावर मराठ्यांचेच राज्य होते आणि जवळपास संपूर्ण भारतात मराठ्यांचेच वर्चस्व होते. दिल्लीचा मुघल बादशहा नामधारी होता. दुसर्या बाजीराव पेशव्याचा इ.स. १८१८ मध्ये पराभव केला तेंव्हाच खर्या अर्थाने भारतावर आपले राज्य स्थापन झाले अशी इंग्रजांची खात्री झाली. इंग्रजांनी भारत ताब्यात घेतला तो मराठ्यांकडून घेतला. स्वपराक्रमाने, स्वकर्तृत्वाने मराठ्यांनी संपूर्ण भारत पादाक्रांत केला होता.

मात्र १८१८ ते १९६० या काळामध्ये बरीच उलथापालथ झाली. इंग्रजांचे राज्य होते. त्यांना सर्वात जास्त प्रतिकार मराठी माणसांनीच केला. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे इ.स. १९२० पर्यंत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मराठी माणसांचाच पुढाकार होता. देशातील इतर प्रांतातील बांधवही यामध्ये सहभागी झाले होते. म. गांधी, सरदार पटेल आणि पंडित नेहरू यांच्याबरोबर मोठ्या प्रमाणावर मराठी बांधव सहभागी झाले होते. मात्र जेंव्हा इंग्रजांनी भारताला भारत परत दिला, तेंव्हा केंद्रीय नेतृत्वामध्ये मराठी माणसाला दुय्यम स्थान दिले गेले. कारण नसताना कर्तृत्ववान मराठी माणसांची अवहेलना केली गेली. अर्थमंत्री धनंजय गाडगीळ, यशवंतराव चव्हाण अशा कितीतरी अभूतपूर्व क्षमता असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या वकुबाप्रमाणे न्याय मिळाला नाही. मराठी माणसाच्या हक्काची मुंबई मिळवण्यासाठी सुद्धा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी करावी लागली.

मराठी माणूस हा काटक, पराक्रमी, धाडसी, हरहुन्नरी आहे, निस्वार्थी, कमालीचा सोशिक आणि सहनशील आहे. मराठी माणसांमध्ये अनेक दोष आणि अवगुण आहेत हेही मान्य केले पाहिजे. मात्र सातत्याने मराठी माणसाने दुय्यम भूमिका स्वीकारायची हे आता थांबले पाहिजे. चित्रपट असो वा खेळ, मराठी माणसांनी कायम सहाय्यक किंवा निम्न दर्जाची कामे करायची. मराठी माणूस म्हणजे घरगडी किंवा कारकुनाचे काम करणारा या गोष्टी आता थांबल्या पाहिजेत. मराठी माणसाकडे कुत्सित नजरेने कुणी पाहता कामा नये. मराठी माणूस हलक्या दर्जाचा आहे, आळशी आहे, दुर्गुणी आहे असे कुणीही

**• साहित्य • संस्कृती • उद्योजकता •**





ऑनलाईन सभासद व्हा www.vishwamarathiparishad.org या संकेतस्थळाला भेट द्या...

७०६६२५१२६२ या क्रमांकावर व्हॉटस्अप लिस्टमध्ये सामील व्हा...

म्हणता कामा नये. यासाठी मराठी माणसांनी आता सिंहावलोकन करावयची गरज आहे. फक्त इतरांना दोष देऊन, टीका करून, त्रागा करून, इतरांचे आणि आपल्याच बांधवांचे वाभाडे काढून चालणार नाही. आपले गुण आणि दोष यांचा अभ्यास केला पाहिजे. आपली दुर्बल स्थाने शोधून काढून त्यावर उपाययोजना केली पाहिजे. आपले सामर्थ्य विकसित केले पाहिजे.

आज जगभरामध्ये सुमारे ६० हून अधिक देशांत सुमारे एक कोटी मराठी बांधव राहत आहेत. त्यांनी स्व–प्रयत्नाने, अविरत कष्टाने, हिमतीने, साहसाने फार मोठी प्रगती केली आहे. आम्ही प्रथम शंभर टक्के भारतीय आहोत नंतर शंभर टक्के मराठी आहोत अशी आमची भूमिका आहे. आपले कोणाशीही भांडण नाही, कोणाविषयी तक्रार नाही. भूतकाळाबद्दल आम्हाला निरर्थक वाद घालायचे नाहीत. आमच्या चुका सुधारून आम्हाला उज्वल भविष्यकाळ घडवायचा आहे. यासाठी विश्व मराठी परिषद कार्यरत आहे.

आधुनिक माहिती तंत्रज्ञान आणि संवाद साधने यांचा अतिशय चतुराईने आणि परिणामकारक वापर करून मराठी माणसाचा विकास करायचा अशी विश्व मराठी परिषदेची मूलभूत संकल्पना आहे. त्याचा मुख्य उद्धेश एकमेकांच्या मदतीने असा जागतिक मराठी समाज घडवायचा की मराठी माणसाला सर्वत्र सन्मान मिळेल, मान्यता मिळेल, त्याची प्रगती होईल. विशेषत: तो आर्थिक दृष्ट्या संपन्न आणि समृद्ध होईल. त्याच्यातील आत्मविश्वास वाढेल. तो समर्थ होईल. २१ व्या शतकातील शिवबांचे मावळे म्हणून तो जगभर पराक्रम गाजवील. यासाठी साहित्य, संस्कृती आणि उद्योजकता या तीन आयमांना केंद्रस्थानी ठेवून विश्व मराठी परिषद कार्यरत आहे. संपन्न, समृद्ध सक्षम आणि सामर्थ्यवान मराठी माणूस घडवण्यासाठी यातून फार मोठे बळ मिळेल, असा विश्व मराठी परिषदेला विश्वास वाटतो.

## विश्व मराठी परिषदेचे सभासद कोणाला होता येईल ?

**वैयक्तिक आजीव सभासदत्व :** भारतातील आणि भारताबाहेरील विविध देशातील युवक, वाचक, रसिक, श्रोते, लेखक, कवी, साहित्यिक, अनुवादक, प्रकाशक, ग्रंथविक्रेता, कलाकार, गायक, संगितकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, गीतकार, चित्रकार, शिल्पकार, प्राध्यापक, शिक्षक, व्याख्याते, गृहिणी, नोकरदार, छोटे व्यापारी, विक्रेते, डॉक्टर, वकील, सीए, आर्किटेक्ट, कार्पोरेट आणि सरकारी अधिकारी, समाजसेवक, मराठी भाषा प्रेमी, इ.

**संस्था,कंपनी कायम सभासदत्व :** वैयक्तिक किंवा भागिदारी व्यापारी संस्था, कार्पोरेट कंपनी, उद्योग, ग्रंथालये, चित्रपटगृह – नाट्यगृहचालक, नाट्यसंस्था, सेवा संस्था, सहकारी किंवा विश्वस्त संस्था, शाळा, महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था, देवस्थान, गावोगावची तरूण मंडळे, गणेशोत्सव मंडळे, व्यवस्थापन मंडळी, इ.

**संस्थेचे कार्य क्षेत्र आणि कार्यविस्तार :** संपूर्ण भारत आणि भारताबाहेरील विविध देश – तसेच मराठी बांधव वास्तव्य करून असणारे प्रदेश आणि मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, कला, संगीत, नाट्य, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, लोककला, लोकसाहित्य, इ. विस्तृत असा कार्यविस्तार आहे.

## सभासदत्व का घ्यावे? अर्थात सभासदत्वाचे फायदे

- लेखक, प्रकाशक, ग्रंथविक्रेते, संपादक, मुद्रीतशोधक, आय.एस.बी.एन. नोंदणी,
  कॉपीराईट याविषयी मार्गदर्शन ऑनलाइन विक्री (अमेझॉन, फ्लिपकार्ट इ. वर विक्री) मार्गदर्शन इ. यांची माहिती
- कथा/ कादंबरीलेखन, ब्लॉगलेखन, अनुवाद, सोशल मिडिया उद्योजकता, मराठी संस्कृती इ. कार्यशाळा ऑनलाइन उपलब्ध
- एक कोटी मराठी बांधवांचे ऑनलाइन व्यासपीठ उपलब्ध
- आपली निर्मिती,उत्पादने, कल्पना आणि उपक्रम करोडो मराठी बांधवांपर्यंत नेता येतील
- भाषा, सहित्य, संस्कृती,उद्योजकता विषयक सर्व प्रकारचे मार्गदर्शन करणारी हेल्पलाइन
- परिषदेच्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग आणि नेतृत्व करण्याची संधी
- साहित्य, संस्कृती, कला, नाट्य, संगीत, नृत्य, चित्रकला, लोककला, लोकसाहित्य, उद्योग आणि उद्योजकता
- इ. विविध क्षेत्रातील अनेक घडामोडींचा आढावा, माहिती आणि मार्गदर्शन इ.
- विश्व मराठी परिषदेचे सभासदत्व – एक प्रतिष्ठा आणि सन्मान

**विनम्र आवाहन** आपण स्वत: विश्व मराठी परिषदेचे वैयक्तिक मानद सभासद व्हावेच त्याचबरोबर आपल्या कुटुंबातील व्यक्ती, आपले देश विदेशातील नातेवाईक, मित्र, सहकारी या सर्वांना सभासद करून घ्यावे. तसेच आपल्या परिसरातील मराठी बांधवांच्या संस्था, कंपन्या यांनाही सभासदत्व घेण्यासाठी आग्रह करावा.

विश्व मराठी परिषदेच्या संकेतस्थळाला भेट द्या आणि सबस्क्राईब करा
**www.vishwamarathiparishad.org**
फेसबुक fb.me/vmparishad पेज लाईक करा ● युट्युब चॅनेल सबस्क्राइब करा – bit.ly/vmp-ytube


**विश्व मराठी परिषद** द्वारा विश्व मराठी फाउंडेशन
६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, डेक्कन जिमखाना, झेड ब्रिज जवळ, पुणे – ४११००४ भारत
मोबाईल : ७०३०४११५०६ फोन : ०२० – २५५१३४६० व्हॉट्सअप : ७०६६२५१२६२
ईमेल : sampark@vmparishad.org संकेतस्थळ : www.vishwamarathiparishad.org फेसबुक : fb.me/vmparishad